
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा.क्र. 9282



## कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401242
BVBK-0401242

# शिक्षणगंगेचा भगीरथ

# शिक्षण-भगीरथ

•

—व. न. इंगळे

कांहीतरी नवेंच करा : ४०

अ.क्र. ९२४२ दि० २०।५।६९
वा.वा.

BVBK-0401242



पन्नास नये पैसे

वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २.

© : १९६०
वोरा अॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

प्रकाशक:
अ. ल. गाडगीळ,
वोरा अॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

आवृत्ति पहिली
१९६०
आवृत्ति दुसरी
१९६३

मूल्य ५० नये पैसे

मुद्रक :
अनंत जे. शाह
लिपिका प्रेस,
कुर्ला रोड, अंधेरी,
मुंबई ५९.



पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांचें नांव उभ्या महाराष्ट्राला माहीत आहे तें शिक्षणक्षेत्रांतील एक जबरदस्त कार्यशक्ति म्हणून. एकाद्या विशिष्ट ध्येयानें प्रेरित झालेली निःस्वार्थी व्यक्ति केवढ्या प्रचंड कार्याचे डोंगर उभी करूं शकते याचें कर्मवीरांचें कार्य हें मूर्तिमंत उदाहरण आहे. भगीरथानें आपल्या पुरुषप्रयत्नांनीं दुर्गम पर्वतांतील गंगा सपाटीवरील सर्व-सामान्य जनांना उपलब्ध करून दिली. अगदीं तशीच कर्मवीरांची कर्तबगारी महाराष्ट्रांत घडली. आणि म्हणूनच या त्यांच्या लहानशा चरित्राला 'शिक्षण-भगीरथ' हें नांव सार्थ वाटतें.

# शिक्षण-भगीरथ : कर्मवीर भाऊराव पाटील

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

## गरिबांचा कैवारी

सन १९०९ च्या सुमाराचा काळ. इस्लामपूर शाळेंतील तो प्रसंग. गुरुजी शिकवीत होते. सर्व मुलें आंत समाधानानें ऐकत होतीं. मात्र शाळेच्या बाहेर बसून एक गरीब मुलगा कान टवकारून तें ज्ञान ग्रहण करण्याचा प्रयत्न करीत होता. त्यावेळीं तेथें एक सद्गृहस्थ आले. त्यांनीं त्या गरीब मुलाची केविलवाणी स्थिति पाहिली. त्यांना त्या गरीब मुलाची दया आली आणि त्या शिक्षकांचा रागहि पण आला.

"हा मुलगा एकटाच बाहेर कां बसला आहे ?" त्यांनीं शिक्षकांना खडसावून विचारलें. धर्माच्या रूढीनें जखडलेला बिचारा शिक्षक ! तो मुलगा महाराचा असल्यानें त्याला आंत बसवितां येत नसल्याचें त्यानें सांगितलें. तेव्हां त्या गृहस्थांनीं संतापानें चिडून त्या शिक्षकांची चांगली हजेरी घेतली. पण ?

"मला या मुलास आंत बसवितां येणार नाहीं" असें शिक्षकानें आपलें पालुपद त्यांना ऐकविलें. अखेर त्या सद्गृहस्थांनीं त्या मुलास जवळ घेतलें. त्याच्या पाठीवरून

प्रेमानें हात फिरविला; आणि म्हटलें, "चल, या असल्या शाळेंत काय शिकतोस? मी तुला दुसऱ्या चांगल्या शाळेंत घालतों."

आपला कैवार घेऊन मास्तरांशीं तावातावानें भांडणाऱ्या सद्‌गृहस्थाची आपुलकी पाहून तो मुलगा बावरला. त्या गृहस्थानीं त्याला घरीं नेलें. आपल्याबरोबर जेवायला घातलें. कधीं न मिळालेला जिव्हाळा पाहून मुलगा गहिंवरला. त्याचा कंठ दाटून आला. नंतर त्यांनीं त्या मुलास कोल्हापूरला 'मिस् क्लार्क होस्टेल' मध्यें ठेवलें. शिक्षण संपल्यावर तोच विद्यार्थी–ज्ञानदेव घोलप–मुंबई विधिमंडळाचा सभासद झाला. 'मूकनायक' या वर्तमानपत्राचा संपादक झाला. पण ते कनवाळू आणि गरिबांचा कैवार घेणारे सद्‌गृहस्थ कोण? महाराष्ट्राचे "शिक्षण-भगीरथ' कर्मवीर अण्णा. त्यांचें संपूर्ण नांव आहे कर्मवीर भाऊराव पायगौंडा पाटील.

## बालपण आणि शिक्षण

कर्मवीर भाऊराव जातीनें जैन. यांचें मूळ आडनांव देसाई होतें. मूळचे विजापूर जिल्ह्यांतील मूलबिद्री गांवचे रहिवाशी. सतराव्या शतकांत त्यांचे वंशज सातारा जिल्ह्यांतील ऐतवाड्यास येऊन पाटीलकीचें वतन मिळवून 'पाटील' झाले. त्यांचे वडील पायगौंडा थोडेंबहुत शिक्षण घेऊन राजदरबारांत नोकरीस होते. पायगौंडांना कुंभोजकर जिनगौंडा पाटलांची सुशील कन्या गंगाबाई पत्नी लाभली होती. यांच्याच पोटीं कर्मवीर भाऊराव

पाटील यांचा जन्म सातारा प्रांतीं कुंभोज या गांवीं ३० सप्टेंबर १८८६ या दिवशीं (आश्विन शु. ५ शके १८०८) झाला. ज्ञानामृताचा 'कुंभ' रयतेला पाजणार म्हणून ते कुंभोज गांवीं जन्मले असावेत. केवळ धनवंताच्या घरांतून वावरणारी शिक्षणाची गंगामाई गोरगरिबांच्या शेतांत झोपडीपर्यंत आणून पोहोंचविणारे म्हणूनच हा आधुनिक शिक्षण-भगीरथ 'गंगामाई' मातेच्या पोटीं अवतरला असावा. आणि पुढें दलितांचा खराखुरा भाऊ होणार म्हणूनच खेड्यांतील भोळ्या भाबड्या बायकांनीं त्यांचें नांव 'भाऊ' असें ठेवलें असावें.

भाऊराव जन्माला आले ते वडिलांकडून साधुत्व आणि मातेकडून बंडखोरी घेऊनच. म्हणूनच कीं काय लहानपणीं ते खोडकर होते. सर्व जमातीच्या पोरांचा पुढारी होऊन खेळायचें, भटकायचें आणि पुष्कळदां शाळेला बुट्टी द्यायची यांतच त्यांचें बालपण गेलें. त्यामुळें त्यांना आईच्या हातचा प्रसादहि भरपूर खावा लागे तरी पण दररोज सकाळीं आईला नमस्कार करण्यास ते चुकत नसत. मोठेपणींहि तो नियम त्यांनीं कसोशीनें पाळला. आईविषयींच्या आदराचें असें उदाहरण अलिकडच्या काळांत शोधून सांपडणेंहि कठीण !

प्राथमिक शिक्षण संपल्यावर भाऊरावांना इंग्रजी शिक्षणासाठीं कोल्हापूरला राजाराम हायस्कूलमध्यें पाठविण्यांत आलें. तेथें गेल्यावर भाऊरावांनीं जैन बोर्डिंगांत प्रवेश मिळविला. जैन लोकांत कमालीचा कर्मठपणा. त्यामुळें जैन बोर्डिंगांत जाचक आणि कडक नियम असल्यास नवल

नाहीं. त्या अनेक नियमांविरुद्ध ते झगडले. अर्थातच त्याचा परिणाम म्हणजे त्यांचे गुरुजी व सुपरिंटेंडेंट श्री. अण्णासाहेब लठ्ठे यांनीं त्यांना बोर्डिंग सोडण्यास भाग पाडलें.

जैन बोर्डिंगमधून बाहेर पडल्यावर त्यांना राजवाड्यांत शाहु महाराजांच्या सहवासांत राहण्याची संधि मिळाली. महाराजांना पहिलवानांबद्दल आपलेपणा वाटे. भाऊरावांनाहि तालमीचा नाद होता. तेव्हां त्यांनीं दररोज दंडबैठकांची मेहनत करून आपलें शरीर आटीव घोटीव पोलादासारखें कणखर बनविलें. या पोलादासारख्या शरिरामुळेंच ते पुढें ज्ञानदानाचीं अविश्रांत आणि अपार कष्टाचीं कामें करूं शकले. शाहूमहाराजांच्या सहवासांत असतांना त्यांचें सर्व लक्ष शरीर कमविण्याकडे होतें. त्यामुळें शालेय अभ्यासांत ते चमकले नाहींत. इंग्रजी सहावीनंतर त्यांनीं शिक्षणास रामराम ठोकला. नंतर ते इस्लामपूरला वडिलांकडे आले. आणि प्रारंभीं सांगितलेला प्रसंग घडला तो या वेळचा.

कोल्हापूरला हायस्कूलचें शिक्षण घेत असतांना त्यांच्या मनावर दोन व्यक्तींचा फार खोलवर परिणाम झाला. पहिली व्यक्ति म्हणजे महाराष्ट्राचे आद्य सर्वांगीण समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले आणि त्यांचें शिक्षणकार्य व सत्यशोधक समाज. दुसरी व्यक्ति म्हणजे राजर्षि शाहुमहाराज आणि त्यांचें बोर्डिंगें स्थापून शिक्षणाद्वारें समाजसुधारणा करण्याचें महनीय कार्य. या सुसंस्कारांमुळेंच भाऊरावांनीं भावी काळांत शिक्षणकार्यासाठीं सारें जीवित वेचलें.

## यशस्वी मास्तर

शिक्षण सोडल्यानंतर त्यांना स्वस्थ कोण बसूं देणार? मुंबईचे प्रसिद्ध व्यापारी शेट माणिकचंद पानाचंद यांच्या डोळ्यांत भाऊराव हा हिरा चांगलाच भरला. म्हणून त्यांनीं भाऊरावांना मुंबईच्या पेढीवर हिऱ्या-मोत्यांची पारख करण्यास नेलें. पण अज्ञानाच्या अंधकारांत पडलेल्या जिवंत हिऱ्या-माणकांना उजेडांत आणण्यासाठीं भाऊराव ती नोकरी सोडून सातारला आले आणि त्यांनीं तेथें खाजगी शिकवणीचा वर्ग सुरू केला. खोडकर व उडाणटप्पू विद्यार्थ्यांना कधीं प्रेमानें, कधीं धमकीनें वठणीवर आणून ज्ञान देण्यांत या 'पाटील मास्तरांचा' त्यावेळीं कोणी हात धरत नव्हतें.

संस्कृत विषय त्यांना जमत नव्हता. त्यांत, सातारा येथील डेप्यूटी कलेक्टर पेठे यांनीं आपल्या मुलास संस्कृत शिकविण्यास भाऊरावांना नेमलें. त्यांना प्रथम संस्कृत शिकविण्याची अडचण वाटत असे. कशी तरी वेळ मारून न्यावी लागे. हें टाळण्यासाठीं प्रथम संस्कृत शिक्षक शास्त्री गजेंद्रगडकर यांच्याकडून त्यांनीं संस्कृत शिकून घेतलें. आणि नंतरच आपल्या विद्यार्थ्यांना त्याचे धडे दिले.

अशा प्रकारें त्यांच्या मनाची निष्ठा, ध्येयावरील श्रद्धा व कार्याची चिकाटी या गुणांमुळें ते प्रथम विषयाची तयारी करीत आणि भल्या पहांटे उठून हातांत कंदील घेऊन घरोघर फिरून तीनचार शिकवण्या करीत. विशेषतः मागासलेल्या विद्यार्थ्यांना ते फार प्रेमानें व आपुलकीनें

वागवीत. साहजिकच त्यांच्या शिकवणीच्या वर्गांत हरिजन विद्यार्थ्यांची संख्या वाढली. हरिजन मुलांकडून ते शिकवणीचे पैसे तर घेत नसतच, उलट त्यांना पाटी, पेन्सील, पुस्तकें, कपडे इत्यादींसाठीं स्वतःच्या मिळकतींतून मदत करीत. त्यामुळें हरिजन मुलांचें ते एक दैवतच बनले होते. या प्रामाणिक कामामुळें त्यांची हुशार व 'होतकरू शिक्षक' म्हणून साऱ्या साताऱ्यांत प्रसिद्धी झाली.

## बॅटरीच्या प्रकाशांत

कर्मवीर अण्णा जास्त शिकले नव्हते. त्यांनीं पुस्तकी ज्ञानहि फारसें अभ्यासिलें नव्हतें पण जीवन-ग्रंथाचें त्यांचें अध्ययन मात्र कमालीचें दांडगें होतें म्हणून ते म्हणत, "मी कांहीं मोठा पंडित किंवा शिक्षणतज्ज्ञ नाहीं. पण व्यवहारांत जे अनुभव आले त्यांचें बारकाईनें अवलोकन करून त्यावरून उपयुक्त असें शिक्षण देऊन रयतेची सेवा करणारा एक साधा सेवक आहें."

त्यांच्या कार्याची पूर्वयोजना कधींच आंखलेली नसे. मात्र एखादी गोष्ट करायची म्हटलें कीं ती केल्याशिवाय ते स्वस्थ बसत नसत. म्हणून ते नेहमीं सांगत, "माझ्या कार्याची योजना मीं कधीं आंखली नाहीं. अज्ञानांधकारांत शिक्षणकार्याच्या बॅटरीचा मी उजेड पाडतों आणि दिसेल तें क्षेत्र पादाक्रांत करतों. त्यानंतर पुन्हा बॅटरीचा प्रकाश पाडतों आणि दृष्टिपथांतील नवीन क्षेत्र आक्रमितों. असाच माझ्या शिक्षणकार्याचा मार्ग मीं चोखाळीत आलों आहें."

त्यांचें संपूर्ण शैक्षणिक कार्य पाहिल्यावर त्यांचे हे उद्गार पटल्याशिवाय रहात नाहींत.

## कार्याचा श्रीगणेशा

खेड्यांतील मुलांना अभ्यासासाठीं स्वतंत्र अशी सोय नसते. आणि आईवडील अशिक्षित असल्यामुळें त्यांना अभ्यासांत मार्गदर्शन करणारेहि कोणी नसतात. त्यामुळें त्यांना बुद्धि असूनहि प्रगति करतां येत नाहीं. हें जाणून कर्मवीर अण्णांनीं सन १९१० मध्यें मध्वान्नामास्तर यांच्या मदतीनें दुधगांव (वाळवें तालुका) येथें ‘दुधगांव विद्यार्थी आश्रम’ ही लहानशी अभ्यासिका काढली आणि शिक्षणकार्याचा श्रीगणेशा केला.

भाऊरावांनीं या आश्रमांत प्रथम गांवांतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची सोय एका प्रशस्त ठिकाणीं केली. शाळेलगतच्या इमारतींतच दिवाबत्तीची सोय केली. सायंकाळीं मुलें तेथें मध्वान्नामास्तरांच्या मार्गदर्शनाखालीं अभ्यास करूं लागलीं. पण या अभ्यासिकेचा फायदा जवळपासच्या खेड्यांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांना घेतां येईना. कारण रात्रीच्या जेवणासाठीं त्यांना घरीं जावें लागे. कर्मवीरांनीं ही अडचण लक्षांत घेतली. आणि गांवकरी मंडळींच्या साह्यानें शेजारच्या खेड्यांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवण्याचीहि सोय दुधगांवांतच केली. त्यामुळें शिक्षण घेण्याला उत्सुक झालेल्या हजारोंना या अभ्यासिकेचा फायदा मिळूं लागला.

## गुरूवर निस्सीम निष्ठा

कोल्हापूरला शिकत असतांना भाऊरावांनीं बोर्डिंग-मध्यें गुरुविरुद्ध तेथील कडक नियमांबद्दल बंड केलें. पण त्यांच्या मनांतील गुरुबद्दलची आस्था, निष्ठा नि प्रेम मात्र केव्हांच कमी झालीं नाहींत. गुरुनिष्ठेच्या कसोटीचा एक प्रसंग त्यांच्या जीवनांत १९१४ मध्यें घडला.

मे महिन्याच्या मध्यावर कोण्या एका इंग्रजद्वेष्टयानें कोल्हापुरांतील व्हिक्टोरिया राणीच्या पुतळयास डांबर फांसलें. श्री. लठ्ठे हे अण्णांचे गुरु. त्यांनीं अण्णांना बोर्डिंगमधून हांकलून दिलें होतें. तसेंच लठ्ठयांच्या सुधारकी मतांमुळें पुरोहितवर्ग त्यांच्यावर असंतुष्ट होता. तेव्हां या डांबर-प्रकरणांत लठ्ठयांविरुद्ध साक्ष देण्यासाठीं भाऊरावांचा उपयोग करून घेऊन लठ्ठयांना दोषी ठरविण्याचें कपट कारस्थान विरोधकांनीं योजिलें. त्यांनीं भाऊरावांना कोल्हापूरला बोलावून घेतलें आणि लठ्ठयांच्या विरुद्ध साक्ष देण्यास सांगितलें. पण या कुटिल कारस्थानांत गोवलें जाऊन गुरुद्रोह करण्याचें अण्णांनीं साफ नाकारलें. तेव्हां त्या निर्दय लोकांनीं त्यांच्यावर खोटेनाटे आरोप लादून, खोटी साक्ष न दिली तर पोलिसांच्या हवालीं करण्याची व तत्कालिन कुप्रसिद्ध कावळयाच्या बंगल्याची भीतिहि दाखविली. तेव्हां अण्णा सिंहाच्या छाव्याप्रमाणें चवताळून म्हणाले, "मला लठ्ठयांनीं बोर्डिंग-मधून हांकलून दिलें म्हणून तुम्हीं मला जीवनांतून कायमचेंच उठवूं पाहतां काय? कावळयाचा बंगलाच काय पण प्रत्यक्ष यमाच्या दरबारांत जरी मला उभें केलें तरी

मी खोटें आणि तेंहि माझ्या गुरुविरुद्ध तर कधींच बोलणार नाहीं."

या करारी उत्तरामुळें त्यांना पोलिसांचा भयंकर छळ सहन करावा लागला. शेवटीं पोलिसांच्या पाशवी यमयातनांना कंटाळून त्यांनीं एकदां पडक्या विहिरींत उडी टाकून आत्मघात करण्याचा प्रयत्न केला आणि दुसऱ्यांदा एकदां खिडकीच्या तावदानाच्या कांचा कुटून खाल्लच्या आणि वर रॉकेल प्याले. अशा प्रकारें आत्महत्येचे दोनदां प्रयत्न केले. पण ईश्वर त्यांना थोडाच मरूं देतोय ! कारण त्यांच्या हातून शिक्षणाचें फार मोठें काम होणार होतें ना ! अखेर काळचाकुट्ट कारस्थानांनीं बरबटलेल्या या डांबरप्रकरणांतून अनेक प्रसंगांना तोंड देऊन ते आरशासारखे स्वच्छ होऊन बाहेर पडले.

**रयत शिक्षण संस्था**

कर्मवीर अण्णांनीं आपल्या कार्याचा श्रीगणेशा दुधगांवला केल्याचें पूर्वीं आलेंच आहे. त्यावेळीं कामाचा व्याप जास्त वाढला नसल्यामुळें अण्णा महात्मा फुले यांनीं स्थापलेल्या 'सत्यशोधक समाजाचें' कार्य करीत होते. पण ज्याप्रमाणें 'घार फिरे अंतराळीं। लक्ष तिचें पिलापाशीं' त्याप्रमाणें त्यांचें सर्व लक्ष दुधगांवला असे.

सन १९१९ मध्यें २५ सप्टेंबरला कराड तालुक्यांतील काले या गांवीं सत्यशोधक समाजाची परिषद भरली होती. परिषदेचें सर्व कामकाज संपलें तेव्हां तेथें कर्मवीर अण्णांनीं 'ग्रामीण जनतेच्या शिक्षणासाठीं एक शिक्षणसंस्था सुरू

करावी' असें सुचविलें. त्या सूचनेस सर्वांनुमतें मंजुरी मिळून रयत शिक्षण संस्थेच्या वटवृक्षाच्या रोपट्याची लागण झाली. त्याचीच दुसरी लहानशी फांदी म्हणजे त्यांनीं सन १९२१ मध्यें नेर्ले येथें सुरू केलेलें बोर्डिंग.

**कामगार मुलांच्या शिक्षणासाठीं**

बोर्डिंग काढल्यानें खेड्यांतील मुलांना ज्ञानामृत मिळूं लागलें. पण परगांवीं कारखान्यांत काम करणाऱ्या कामगार मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न त्यांना भेडसावूं लागला. तेव्हां अण्णांनीं त्यांचे मित्र कै. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्या कारखान्यांत जबाबदारीचें काम करण्यास सुरुवात केली, आणि किर्लोस्करांना सुचविलें कीं, 'कामगारांच्या मुलांनाहि शाळेच्या व्यतिरिक्त कारखान्यांत थोडें थोडें काम दिल्यास त्यांच्या शिक्षणाचा बोजा त्यांच्या गरीब आईबापांवर पडणार नाहीं.' पण अण्णांची ही इच्छा तेथें पूर्ण झाली नाहीं. म्हणून ते अखेर राजीनामा देऊन तेथून बाहेर पडले. परंतु मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करण्यासाठीं लागलेलें कारखान्याचें वेड कांहीं त्यांच्या डोक्यांतून गेलें नाहीं. आपल्या इच्छेला योग्य वळण देण्यासाठीं त्यांनीं कूपरना सहकार्य देण्याचें ठरविलें. भाऊरावांनीं त्यासाठीं प्रचारकार्यहि खूप केलें. सातारा रोडला लोखंडी नांगरांचा कारखाना काढण्यांत आला. कारखाना सुरू करतांना कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासंबंधींची पुरेपूर कल्पना त्यांनीं कूपरांच्या पुढें ठेवली होती. ती अशी कीं, 'कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठीं

कंपनीनें स्वखर्चानें शाळा काढावी आणि त्या मुलांना शाळेंत फी माफ करावी. तसेंच या शाळेंतील मुलांना दररोज शाळेच्या वेळा व्यतिरिक्त कारखान्यांत काम द्यावें म्हणजे त्यांचा कागद-पुस्तकांचा वरखर्च बाहेर पडेल.' कूपरनीं या योजनेस मान्यता दिली पण लेखी करारनामा कांहीं केला नाहीं असें म्हणतात. पुढें कारखान्याचें बस्तान चांगलें बसलें, पण बोलल्याप्रमाणें शिक्षणाची सोय होईना. तेव्हां तेथूनहि भाऊरावांना बाहेर पडावें लागलें. आणि अन्यायाविरुद्ध, 'राबणाऱ्यांचा कारखाना' हा आवाज घुमविण्यासाठीं बहुजन समाजामध्यें शिक्षणप्रसार करण्या-कडेच भाऊरावांनीं सारें लक्ष देण्याचें महाकठीण व्रत घेतलें.

**तनमनधन शाहु बोर्डिंगला**

कालें येथें लावलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या रोपटचानें अजून चांगलें मूळ धरलें नव्हतें तोंच त्यांनीं मराठ्यांच्या इतिहासप्रसिद्ध राजधानीचें सातारा शहर हें आपलें कार्य-क्षेत्र निवडलें. तेंच रोपटें त्यांनीं १९२४ सालीं मोहिते नांवाच्या एका हरिजन विद्यार्थ्याच्या साह्यानें साताऱ्यांत लावलें. तेंच 'छत्रपति शाहु बोर्डिंग.'

एकजिनसी समाज निर्मिण्याचें त्यांचें स्वप्न होतें. आणि त्या दृष्टीनें जातिभेद हे त्यांना अडचणीचे वाटत होते. म्हणून जरी शाहु महाराजांनीं शिक्षणासाठीं प्रत्येक जाती-स्तव स्वतंत्र व निरनिराळीं वसतिगृहें काढलीं तरीपण कर्मवीर अण्णांनीं त्यांच्यापुढें एक पाऊल टाकून सर्व जातींतील विद्यार्थ्यांकरितां एकच एक असें हें शाहु बोर्डिंग

काढलें. जातपात धर्म-पंथ-भेद यांचीं बंधनें मोडून टाकून ते सर्व जमातीच्या मुलांना एकसारखे वागवीत. बोर्डिंग-मध्यें प्रवेश दिलेल्या मुलांच्या रहाण्याची, जेवण्याची व्यवस्था ते स्वखर्चानें करीत असत. संस्थेच्या मालकीची त्यावेळीं एकहि शाळा नसल्यामुळें त्या मुलांना योग्य शाळेंत प्रवेश मिळवून देत असत. एवढेंच काय, पण सर्व मुलांची शिक्षण फी सुद्धां स्वतःच्या पैशांतूनच भरत असत.

पहिल्या वर्षीं बोर्डिंगमध्यें चारच मुलें होतीं. त्यांपैकीं दोन मराठे, एक महार आणि एक जैन (म्हणजे त्यांचा भाऊच) होता. पहिल्या वर्षीं हीं मुलें अण्णांच्याच घरांत रहात असत. मुलांची संख्या वाढतां वाढतां १९२७ सालीं त्यांचा आकडा तिसावर आला. त्यामुळें एके ठिकाणीं रहाण्यासाठीं सोईची जागा मिळेना. कांहीं मुलें अण्णांच्या शेजारीं कोळेबाई यांच्या घरीं राहूं-जेवूं लागलीं. कांहींजण अण्णांच्या दुसऱ्या घरीं म्हणजे मावशीबाईंच्या घरांत राहूं लागलीं. आईवडील गरीब असल्यामुळें त्या मुलांना घराहून एक पैसाहि मिळत नसे. त्यामुळें कर्मवीर अण्णाच सर्वांचे एका अर्थानें वडील बनले होते.

अशा प्रकारचीं बोर्डिंगें चालवायचीं म्हणजे अतिशय खर्चाचें काम असे. दिवसभर बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांचीं कामें पहाण्यांतच त्यांचा वेळ जाई. त्यामुळें त्यांना द्रव्यार्जना-साठीं कांहीं उद्योग करण्यासहि सवड मिळत नसे. त्यावेळीं विद्यार्थ्यांच्या जेवणासाठीं, शाळेच्या फीसाठीं, आणि कागद-पुस्तकांसाठीं कर्मवीर अण्णांनीं आपली पंधराशे रुपयांची शिल्लक पुंजी खर्च केली. पण मुलें वाढत

असल्यामुळें खर्च वाढतच होता. तेव्हां त्यांनीं किर्लोस्कर कारखान्यांत असलेले एक हजार रुपये किमतीचे आपले 'शेअर्स' (भाग) विकून त्याचे सर्व पैसे खेडयापाडयांतून जमविलेल्या मुलांबाळांच्या शिक्षणार्थ कामीं लावले. अशा प्रकारें कर्मवीर अण्णांची स्वतःची कमाई संपुष्टांत आली.

**पत्नीचे दागिने मोडले**

कर्मवीर अण्णांची स्वतःच्या मालकीची पुंजी व मिळकत संपली. 'पुढें मुलांच्या शिक्षणाचें काय होणार ?' हा प्रश्न त्यांना भेडसावूं लागला. पण सुदैवानें त्यांची पत्नी चांगल्या श्रीमंत घराण्यांतील होती. त्या माउलीनें माहेराहून येतांना बरोबर जवळ जवळ ९० तोळे वजनाचे सोन्याचे दागिने आणले होते. अण्णांना जेव्हां जेव्हां गरज पडे तेव्हां तेव्हां गोड बोलून ते आपल्या पत्नीकडून एकेक सोन्याचा दागिना मागून घेत आणि त्यावर मुलांचा खर्च भागवीत. कालान्तरानें पत्नीचे सर्वच दागिने संपून गेले. गळयांतील मणिमंगळसूत्र काय तें शिल्लक राहिलें. एकदां लक्ष्मीबाईंचा भाऊ त्यांच्याकडे आला होता. ही सर्व स्थिति पाहून त्यानें तिला 'येथें लंकेची पार्वती होऊन रहाण्यापेक्षां स्वतःच्या घरीं चलण्यास' विनविलें, पण "हेंच माझें घर आणि मी येथेंच राहणार" असा निश्चयी जबाब तिनें भावाला दिला.

**धनिणीच्या बागेंत**

सातारच्या महाराजांकडून धनिणीची बाग अण्णांना मिळाली. ही बाग सातारच्या वायव्य भागांत आहे. मुलांची

संख्या जास्त वाढल्यामुळें अण्णांनीं सन १९२७ मध्यें शाहु बोर्डिंग धनिणीच्या बागेंत नेलें. पण तेथें मुलांना रहाण्यास इमारत कोठली ? त्यांनीं मुलांच्या मदतीनें गवताच्या झोपडचा बांधल्या. मुलें शेतांत काम करीत; हातानें स्वयंपाक करीत आणि स्वतः बनविलेल्या चंद्र-मौळींत ज्ञानाचे धडे गिरवीत. पावसाळचांत पाऊस पडूं लागला म्हणजे या झोपडचांत कोरडी अशी जागाच रहात नसे. मुलें झोपडीच्या कुडाच्या कडेनें पाणी काढून देत व कोरडचा जागेवर मुटका करून कुडकुडत कशी तरी रात्र काढीत.

बोर्डिंग धनिणीच्या बागेंत नेल्यानंतर कांहीं दिवसांनीं पत्नीसह भाऊरावहि धनिणीच्या बागेंत मुलांबरोबर राहूं लागले. दररोज सकाळीं अण्णा सर्वांना भल्या पहांटे उठवीत, शाळेचा अभ्यास करून घेत. शालेय अभ्यासा-बरोबर ते मुलांना महाराष्ट्रांतील आद्य समाजसुधारक महात्मा ज्योतीराव फुले आणि अमेरिकेंतील निग्रो लोकांची शिक्षणाद्वारें उन्नति करणारा महापुरुष बुकर टी. वॉशि-ग्टन यांच्या कथा सांगत, त्यांचा आदर्श पुढें ठेवीत. आणि महाराष्ट्रांतील बहुजन समाजाच्या दुःखाचें चित्र उभें करून त्यांची सेवा करण्याचा उपदेश करीत. दररोज प्रातःकाळीं मुलांचे दोन गट करून अण्णा त्यांना पळण्याचा व्यायाम देत असत. दोन्ही गटांबरोबर ते स्वतःहि पळून येत असत. बोर्डिंगसाठीं लागणारा माल आणण्याचें कामहि मुलें स्वतः करीत. अण्णा पैसे देत. मुलें प्रामाणिकपणें बाजार करीत आणि हिशोबहि चोख ठेवीत.

## महात्मा गांधींचा आशीर्वाद

सन १९२७ मध्यें महात्मा गांधी साताऱ्याला येणार होते. त्यांनीं या लहानशा बोर्डिंगला भेट देऊन नामकरण विधि करण्याचें कबूल केलें होतें. पण अशा तऱ्हेनें चाल-लेल्या बोर्डिंगमध्यें सातारवासीयांना कांहीं तथ्य वाटलें नाहीं. त्यांनीं बापूजींना हें भिकार (!) बोर्डिंग पहाण्यांत वेळ न घालविण्याबद्दल सांगितलें, पण गांधीजींनीं तें ऐकलें नाहीं. ते २५–२–१९२७ रोजीं धनिणीच्या बागेंत आले. त्यांच्या पवित्र हस्तानें 'छत्रपति शाहु बोर्डिंगचें' नाम-करण झालें. वसतिगृहाचें 'शाहु बोर्डिंग' हें नांव पाहून बापूजींनीं अण्णांना हंसत हंसत विचारलें, "या बोर्डिंगला शाहु महाराजांचें नांव दिलें आहे त्या अर्थीं त्यांनीं तुम्हांला चिक्कार पैसा दिला असेल."

"एक पैहि नाहीं" कर्मवीर अण्णांनीं अभिमानानें उत्तर केलें, "शाहु महाराजांनीं मला फक्त रयत सेवकाचें अंतःकरण दिलें आहे."

हें ऐकून बापूजींना अत्यानंद झाला. त्यांनीं अण्णांच्या कार्याला आशीर्वाद दिला. बोर्डिंगमध्यें सर्व जातींचीं मुलें एकत्र असलेलीं पाहून त्यांना समाधान वाटलें. सुदैवानें त्याच वर्षीं एका महार जातीच्या विद्यार्थ्यानें संस्कृत-सारख्या कठीण विषयांत जास्त गुण मिळवून पहिला क्रमांक मिळविला होता. ही गोष्ट कळल्यानंतर तर गांधीजींचा आनंद गगनांत मावेना. ताबडतोब त्यांनीं आपल्या गळ्यांतील पुष्पहार काढून त्या महार विद्यार्थ्याच्या

गळ्यांत घालून त्याला शाबासकी दिली आणि अण्णांच्या कार्याचें मनापासून कौतुक केलें. अण्णांना अशा प्रकारें एका महात्म्यापासून (म. फुले) कार्याची स्फूर्ति मिळाली तर दुसऱ्या महात्म्याकडून ( म. गांधी ) त्या कार्यास आशीर्वाद मिळाला.

**लक्ष्मी–भाऊंची त्यागज्योत**

गोरगरिबांच्या मुलांच्या उन्नतीसाठीं कर्मवीर चंदनासारखे झिजत होते, मेणबत्तीसारखे जळत होते. त्यांना बोर्डिंग हेंच घर व तेथील मुलें म्हणजे स्वतःच्या मुलांप्रमाणें वाटत होतीं. स्वतःच्या संसाराकडे त्यांनीं कधींच पाहिलें नाहीं. बोर्डिंगच्या मुलांची जितकी त्यांनीं काळजी घेतली, तितकी त्यांनीं आपल्या स्वतःच्या मुलाची— अप्पासाहेबांची देखील घेतली नाहीं. ह्या त्यांच्या त्यागाला खरीखुरी जर कोणी साथ दिली असेल तर त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनींच. त्याहि स्वयंपाकपाणी करण्यास मुलांना मदत करीत, मुलांची सेवाशुश्रूषा करीत, सर्व मुलांना आईची माया लावून सांभाळीत. एकदां असेच भाऊराव बोर्डिंगला मदत जमविण्यासाठीं बाहेरगांवीं गेले असतां इकडे बोर्डिंगमध्यें एक मुलगा फार आजारी पडला. त्याच्या सेवाशुश्रूषेंत त्या गढून गेल्या होत्या. त्यांतच माहेराहून त्यांची आई आजारी असल्याची तार आली. लक्ष्मीबाईंना इकडे आड अन् तिकडे विहीर असें झालें. अखेर 'मुलगा आजारी-येतां येत नाहीं,' अशी उलट तार पाठवून त्या माय माउलीनें मातेची ममता महाराष्ट्राला मार्गदर्शक करून ठेवली.

## मणिमंगळसूत्रहि गहाण ठेवलें !

असेच एकदां कर्मवीर अण्णा बाहेरगांवीं गेलेले ! तो सणाचा दिवस होता. बोर्डिंगमध्यें तर धान्याचा कण नाहीं. उधार माल मिळणें महाकठीण झालें. सणाच्या दिवशीं दुसरीं मुलें गोडधोड खाऊन आनंदी असणार आणि बोर्डिंगचीं मुलें उपाशी राहून केविलवाणी चिमणीसारखीं तोंडें करून बसणार, हा विचार तिला सहन झाला नाहीं. तिनें बोर्डिंगमधील मुलांना जवळ बोलाविलें. जो अलंकार पति जिवंत असतांना स्त्रिया गळ्यांतून काढीतहि नाहींत असा तो सौभाग्याचा अलंकार, स्त्रियांना प्राणाहून श्रेष्ठ वाटणारा दागिना–गळ्यांतील मणिमंगळसूत्र त्या पतिव्रता माउलीनें काढून मुलांच्या जवळ दिलें. आणि तें गहाण ठेवून धान्य आणण्यास सांगितलें. कोमल मनाचीं मुलेंच तीं ! त्यांना हा असामान्य त्याग पाहून गहिंवरून आलें. तीं मुलें ओक्साबोक्सीं रडूं लागलीं. लक्ष्मीबाईहि गहिंवरल्या. पण त्यांनीं स्वतःला सांवरलें आणि 'सत्कार्यासाठीं कोणतीहि गोष्ट करणें अशुभ नाहीं,' असें सांगून मुलांची समजूत घातली. आणि आनंदानें मुलांना सण करून घातला.

अण्णा एकदोन दिवसांनीं परत आले. पत्नीचा गळा मोकळा असलेला पाहून त्यांनीं विचारलें—

"तुझें मणिमंगळसूत्र कोठें आहे ?"

"तुम्ही जवळ असतांना निराळ्या मणिमंगळसूत्राची काय गरज ?" लक्ष्मीबाईनीं लाजून उत्तर दिलें आणि

एकदोन दिवसांपूर्वीं घडलेला प्रसंग सांगितला. अण्णांना जसें आश्चर्य वाटलें तशी धन्यताहि वाटली.

**सत्याग्रहांत उडी**

१९२९–३० सालांतील तो प्रसंग. बोर्डिंगांत विद्यार्थ्यांची संख्या वाढली होती. हीं दोघे पतिपत्नी मातापित्याप्रमाणें मुलांची सेवा करीत होतीं. पण त्यावेळीं गांधींनीं सरकारविरुद्ध सत्याग्रहाचें शस्त्र परजलें होतें. सर्व देश जागा झाला, मग कर्मवीर अण्णांना झोप कुठली ? त्यांचा कामेरीला सत्याग्रह निश्चित झाला. लक्ष्मीबाईंना हें कळतांच त्या त्यांच्याकडे भीतभीतच आल्या आणि त्यांना सत्याग्रहास न जाण्याबद्दल विनवणी करूं लागल्या. पण अण्णांच्या तरुण रक्ताला बंधन कोठलें ठाऊक ? अखेर त्यांनीं स्पष्टच विचारलें, "तुम्हीं उद्यां सत्याग्रह कराल आणि तुरुंगांत जाल. येथें बिचाऱ्या गरीब मुलांची स्थिति काय होईल ? जग काय म्हणेल ?"

"नाहीं, मला गेलेंच पाहिजे." भाऊराव बोलूं लागले. देशाच्या हांकेला ओ दिलीच पाहिजे असें अण्णांच्या मनानें पक्कें घेतलें. ते कामेरीला निघून गेले. असंख्य जनसमुदायापुढें विचारधारांचें धो धो असें वक्तृत्व सुरू झालें. त्यास मुसळधार पावसानें सांथ दिली. लोक भिजले पण भाषण संपेपर्यंत जागचे हालले नाहींत. त्यांनीं सरकारवर टीकेचे कडाडून हल्ले चढविले. त्यास कडाडणाऱ्या विजांनीं सांथ दिली. इकडे लक्ष्मीबाई अण्णा सत्याग्रहांत पकडले जाऊं नयेत म्हणून देवाचा धांवा

करीत बोर्डिगांत बसल्या होत्या. देवानें त्यांची हांक ऐकली. कर्मवीर अण्णा सुखरूप परत आले.

## मुलांची 'आई' गेली

३० मार्च १९३० चा अपशकुनी दिवस उगवला. जिनें बोर्डिगच्या मुलांना स्वतःच्या मुलापलीकडे माया लावून सांभाळलें, ती मायमाउली आजारी पडून शेवटचे क्षण मोजूं लागली. मरणापूर्वी त्या माउलीनें सर्व मुलांना जवळ बोलावून डोळ्याचें पारणें फिटेपर्यंत एकवार पाहून घेतलें. आणि अण्णांना जवळ बोलावून सांगितलें, "मी चाललें, आतां या मुलांना सोडून तुम्ही कुठेंहि जाऊं नका. उद्या पाडव्याचा सण आहे. मी गेलें तरी सर्वांना जेवूं घाला, आणि हें बोर्डिंगचें रोपटें मरूं देऊं नका." धीराच्या अण्णांचाहि कंठ दाटून आला. तिची इच्छा पूर्ण करण्यास्तव अण्णांनीं आपला हात तिच्या हातांत दिला. लक्ष्मीबाई समाधानानें मरण पावल्या. बोर्डिंगमधील मुलांनीं आई गेल्याप्रमाणें हंबरडा फोडला. ती मायमाउली सर्वांना मातेची ममता देऊन गेली. सौभाग्याच्या मरणानें मेली. आपलें आयुष्य कर्मवीर अण्णांना देऊन गेली.

पत्नीला दिलेल्या शब्दाप्रमाणें कर्मवीरांनीं बोर्डिंगचें रोपटें मरूं तर दिलें नाहींच पण तें संगोपून त्याचा महान् वटवृक्ष केला. गरीब मुलांना पुण्यासारख्या शहरांत कमी खर्चांत शिक्षण घेतां यावें म्हणून अण्णांनीं पुण्याला 'युनियन बोर्डिंग' काढलें अन् परदेशांत लंडनमध्यें

'महात्मा गांधी बोर्डिंग' काढून पत्नीच्या शब्दाला ते खरोखरोच जागले.

### आईचा आनंद

लक्ष्मीबाईंच्या निधनानंतर त्यांच्या शब्दाबाहेर कर्मवीर कधीं गेले नाहींत. बोर्डिंगची सर्व व्यवस्था ते जातीनें पाहूं लागले. लहानपणापासून अण्णांपाशीं असलेले विद्यार्थी अण्णांशीं घरची आठवणहि काढीत नसत. इतके ते विद्यार्थी एकरूप झाले होते. कर्मवीर अण्णा खेड्यापाड्यांतून फिरून हुशार मुलें शोधून आणीत. त्यांना सातारा येथें प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण देत. नंतर ते त्यांना सांगली, कोल्हापूर, पुणें या ठिकाणीं कॉलेजमध्यें पाठवून उच्च शिक्षणहि देत. एवढेंच काय पण आळीपाळीनें पुढील शिक्षणासाठीं परदेशींहि पाठवीत. याचें मूर्तिमंत उदाहरण म्हणजे छत्रपति शिवाजी कॉलेजचे हल्लीचे प्राचार्य (बॅ.) पी. जी. पाटील हे होत. अण्णांनीं शिकविलेले बहुतेक विद्यार्थी अण्णांच्या हांकेला ओ देऊन आज संस्थेंत निरनिराळ्या जागांवर कामें करीत आहेत.

कर्मवीर अण्णा, माध्यमिक शिक्षणानंतर उच्च शिक्षण घेण्यासाठीं 'सौ. लक्ष्मीबाई पाटील शिक्षणोत्तेजक फंडां'तून कर्जाऊ पैसे देत असत; पण परतफेडीचा करारनामा विद्यार्थ्यांकडून करून घेत नसत. हें वागणें त्यांच्या एका स्नेह्याला धोक्याचें वाटलें म्हणून त्यांनीं तसें वागण्याचें कारण अण्णांना विचारलें. त्यावर अण्णांनीं हंसत हंसत उत्तर दिलें, "आई आपल्या मुलांची लहानाचा मोठा

होईपर्यंत सेवा करते. त्याबद्दल मुलांकडून करारनामाच लिहून घेते का ? नाहीं ! आई मुलाकडून कशाचीच अपेक्षा करीत नसते. सेवा हेंच तिचें समाधान असतें. तसें माझें आहे." तो मित्र कर्मवीर अण्णांच्याकडे दिङ्मूढ होऊन पहातच राहिला. आणि कर्मवीर अण्णा आईच्या मायेनें आनंदित होऊन हंसत राहिले.

## खाजगी ट्रेनिंग कॉलेज

बोर्डिंगानंतर अण्णांचें लक्ष प्रथम ट्रेनिंग कॉलेजकडे वेधलें. १९२१ सालीं अंगापूर ( ता. कराड ) या गांवीं अण्णांच्या अध्यक्षतेखालीं शिक्षकांची परिषद भरली होती. त्यावेळींच त्यांनीं ट्रेनिंग कॉलेज काढण्याचें जाहीर केलें होतें, पण त्यांची ती इच्छा पुढें चवदा वर्षांनीं पूर्ण झाली. त्याचें असें झालें. सन १९३० मध्यें साताऱ्याला हमीद अली यांची कलेक्टर आणि डिस्ट्रिक्ट जज्ज म्हणून नेमणूक झाली. अचानक ते एके दिवशीं धनिणीच्या बागेंत आले. तेथील वातावरण आणि अण्णांचें कार्य पाहून त्यांना समाधान वाटलें. त्यांना कर्मवीरांबद्दल आदर वाटूं लागला. आणि आदराचें रूपांतर मैत्रींत झालें.

१९३५ हें साल ब्रिटिश राज्यांत 'सिल्व्हर ज्यूबिली वर्ष' म्हणून मानलें जात होतें. तेव्हां या मुहूर्तावर ट्रेनिंग कॉलेज काढण्यास हमीद अलींनीं सुचविलें. कारण त्या काळांत मुंबई प्रांतांत फक्त दोनच ट्रेनिंग कॉलेजें होतीं आणि तींहि सरकारनें चालविलेलीं. त्यामुळें विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणें कठीण जात असे. तें पाहून वरील सूचनेस अण्णांनीं

तात्काळ होकार दिला. आणि, जून १९३५ पासून 'सिल्व्हर ज्यूबिली ग्रामीण ट्रेनिंग कॉलेज' सुरू केलें; तेंच 'महात्मा फुले अध्यापक विद्यालय' या नांवानें सध्यां ओळखलें जात आहे. हेंच महाराष्ट्रांतील पहिलें खाजगी ट्रेनिंग कॉलेज.

कांहीं दिवसांनीं सहज बोलतां बोलतां कलेक्टर हमीद अलींच्या पत्नीनें अण्णांच्याकडे तक्रार केली कीं, "तुम्हीं फक्त पुरुषांसाठीं ट्रेनिंग कॉलेज काढलें, स्त्रियांसाठीं कांहींच कां नाहीं ?" तें ऐकून त्यांनीं १९४२ मध्यें सातार्‍यांत मुलींसाठीं 'जिजामाता अध्यापिका विद्यालय' काढलें. तदनंतर प्राथमिक शाळांवर ट्रेन्ड शिक्षकांची जरुरी जास्त प्रमाणांत भासूं लागली. म्हणून आणखी चार ट्रेनिंग कॉलेजें अण्णांनीं काढलीं. कोल्हापूरच्या शहाजी महाराजांनीं संस्थेला रुकडी येथें १३० एकर जमीन व ३७ इमारती देणगी दाखल दिल्यामुळें अण्णांना तेथें 'शाहू अध्यापक विद्यालय' काढतां आलें.

त्याचप्रमाणें अण्णांच्या सडेतोड, कटु सत्यें सांगणार्‍या वाणीचा किती परिणाम होतो याचें एक उत्कृष्ट उदाहरण सांगण्यासारखें आहे. एकदां ग्वाल्हेरचे महाराजासाहेब जिवाजीराव शिन्दे यांच्याकडे अण्णा गेले. त्यांच्याशीं जास्त परिचय नसतांनाहि अण्णांनीं त्यांना संस्थेच्या कार्याची माहिती सांगितली. आणि तशा शैक्षणिक कार्यासाठीं त्यांच्या पडून असलेल्या राजवाड्यांची मागणी केली. महाराजांनीं प्रथमच कांकूं केलें, तेव्हां अण्णा निर्भीडपणें म्हणाले, "तुम्ही राजवाडे असेच पाडून ठेवणार असाल तर खुशाल ठेवा. कालान्तरानें ते जमीनदोस्त होतील;

गांवकरी चुलीसाठीं त्याच्या विटा नेतील अन् त्या जागीं शौचकूप होईल. पण आम्हांला द्याल तर त्यांत सरस्वतीचा वीणा घुमेल."

या त्यांच्या निर्भय बोलण्यानें महाराजांच्या मनावर उशिरा कां होईना परिणाम झाला. या प्रसंगानंतर कांहीं दिवसांनीं त्यांनीं अण्णांना बोलावून घेऊन तीन राजवाडे आणि १२७५ एकर जमीन संस्थेला देणगी म्हणून दिली. त्यामुळें अण्णांना जामगांवला 'महाराजा महादजी शिंदे अध्यापक विद्यालय' काढणें सोपें झालें. तसेंच त्यांनीं कुसूर व अष्टें येथेंहि ट्रेनिंग कॉलेजें काढलीं.

**दऱ्याखोऱ्यांतून व्हॉलंटरी शाळा**

सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठीं अण्णा सबंध महाराष्ट्रभर फिरले. त्यावेळीं त्यांना महाराष्ट्र शिक्षणाच्या बाबतींत फारच मागासलेला असल्याचें आढळून आलें. तेव्हां, सातारा जिल्ह्यांत एकहि खेडें प्राथमिक शाळेविना राहूं द्यायचें नसल्याची इच्छा त्यांनीं बोलून दाखविली. त्यांना प्राथमिक शाळेची गरज भासण्याचें तात्कालिक कारण म्हणजे साताऱच्या सिल्व्हर ज्यूबिली ग्रामीण ट्रेनिंग कॉलेजमधील विद्यार्थी–शिक्षकांना पाठ घेण्यासाठीं साताऱ्यांतील म्युनिसिपल शाळेंत जावें लागे. ही उणीव भरून काढण्यासाठीं अण्णांनीं साताऱ्यांत 'रा. ब. काळे प्रॅक्टिसिंग स्कूल' नांवाची पहिली शाळा काढली.

त्याच दरम्यान कॉंग्रेसचें मंत्रिमंडळ राज्यावर आलें. अण्णासाहेब लठ्ठे हे त्यावेळीं अर्थमंत्री होते. श्री. लठ्ठे नि

अण्णा या गुरुशिष्यांची भेट झाली. व्हॉलंटरी शाळा काढण्याबद्दल चर्चा झाली. अखेर अण्णासाहेब लठ्ठे आणि मुख्य मंत्री खेर यांनीं व्हॉलंटरी शाळा काढणाऱ्या संस्थेस ग्रँट देण्याचें जाहीर केलें. असली सुवर्णसंधि अण्णा वाया कशी घालवणार ? त्या संधीचा फायदा घेऊन त्यांनीं ग्रामीण शिक्षणाचें कार्य हातीं घेतलें. आणि ग्रामीण शिक्षणाचें कार्य भारतांत कोणीं केलें नाहीं इतकें त्यांनीं करून दाखविलें. भगीरथाला जेवढे कष्ट स्वर्गांतून गंगा भूतलावर आणण्यास पडले नसतील तितके कष्ट अण्णांना ही ज्ञानगंगामाई रानावनांतून, कडेकपाऱ्यांतून, दऱ्या-खोऱ्यांतून आणि गिरि-गुहांतून शेतकऱ्यांच्या, काम-कऱ्यांच्या, दलितांच्या झोपडी झोपडींत पोहोंचविण्यास झालेले आहेत. व्हॉलंटरी शाळा काढण्यास सरकारनें जेथें हात टेकले तेथें अण्णांनीं ठामपणानें पाय रोवले. पैशानें सुद्धां जिथें काम होत नव्हतें तिथें त्यांनीं आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर तें काम करून दाखविलें.

गांवोगांव व्हॉलंटरी शाळा काढल्या तरी इमारतीची वाण असे. तेव्हां अण्णांनीं देवळें हींच ज्ञानाचीं मंदिरें बनविलीं. सन १९३८ पासून प्राथमिक शिक्षणाचें काम हातीं घेऊन १९५६ पर्यंत त्यांनीं तनमनधन अर्पण करून केलें. १९४९-५० या शैक्षणिक वर्षांत सर्वांत जास्त म्हणजे ५७८ व्हॉलंटरी शाळा चालवून उच्चांक गांठला आणि ज्ञानाच्या गंगामाईचें पाणी अडाणी आडरानाला पाजून त्या जागीं ज्ञानपूर्ण फुलबागा फुलविल्या. जंगलाचें मंगल

करणारें हें कार्य पाहून लोकांना कळून चुकलें कीं, भाऊराव हे महाराष्ट्रांतील रयतेचे खरेखुरे सेवक आहेत.

स्वातंत्र्य मिळाल्यावर सर्व शाळा सरकारनें चालविण्यासाठीं ताब्यांत घेऊन अण्णांचा कामाचा मोठा बोजा कमी केला.

**प्रौढ शिक्षण**

स्वातंत्र्यपूर्व कालांत महाराष्ट्रांत प्रौढ अशिक्षितांची संख्या कांहीं कमी नव्हती. अजूनहि ती समाधानकारक कमी झालेली नाहीं. हल्लीं प्रौढ शिक्षणाचें काम सरकारतर्फे योग्य तऱ्हेनें म्हणाव्या तेवढचा अपेक्षेप्रमाणें होत नाहीं. पण कर्मवीर अण्णांच्या वाणींत कांहींतरी निराळीच जादू होती. त्यांनीं प्रौढ शिक्षणाचें काम शिक्षकांना सांगतांच त्यांनींहि कंबरा कसल्या आणि कामाला सुरुवात केली. सायंकाळीं शेतांतून काम करून माणसें घराकडे परतलीं कीं तशींच शाळेंत जाऊं लागलीं. पानतंबाखूबरोबर ज्ञानामृताचे प्याले पिऊं लागलीं. त्यामुळें बऱ्याच गांवांतील प्रौढ माणसें शेतांत नांगर चालवून दुपारच्या विश्रांतीच्या वेळीं पुस्तकें वाचीत बसलेलीं आहेत असें दृश्य दिसूं लागलें.

ही त्यांची ज्ञानाची लालसा कायम ठेवण्यासाठीं संस्थेतर्फे गोकुळअष्टमी, गणेशचतुर्थी, रामनवमी यासारखे धार्मिक सण आणि प्रजासत्ताक दिनासारखे राष्ट्रीय दिवसहि गांवकऱ्यांसह उत्साहानें साजरे होऊं लागले. त्याचप्रमाणें प्रौढांची ज्ञानतृप्ति करण्याकरितां गांवोगांव

ग्रंथालयें काढण्याचेहि प्रयत्न अण्णांच्या इच्छेनुरूप झाले. प्राथमिक शिक्षक जातीनें लक्ष घालून हीं ग्रंथालयें वाढविण्यासाठीं व त्यांचा फायदा प्रौढांना व मुलांना करून देण्यासाठीं धडपडत असत. अशा प्रकारें तिसाच्यावर ग्रामीण ग्रंथालयें चालविलीं गेलीं.

**अण्णांनीं उभारलेलीं 'देवमंदिरें'**

प्राथमिक शिक्षणानंतर अण्णांनीं माध्यमिक शिक्षणाकडे आपलें लक्ष वळविलें. त्यांनीं पहिलें हायस्कूल १९४० सालीं सातारा येथें 'महाराजा सयाजीराव विद्यालय' नांवानें सुरू केलें. महाराजांनीं ताबडतोब ४,००० रुपयांची देणगी या कामासाठीं अण्णांच्या हातीं सुपूर्त केली. जवळ जवळ १९५७ पर्यंत अण्णांनीं तें हायस्कूल मोफत चालविलें. वाई तालुक्यांतील लोणंद येथें त्यांनीं दुसरें हायस्कूल सुरूं केलें. त्यासाठीं नाईक निंबाळकर व सभोंवतालच्या जनतेनें खूप श्रम करून हायस्कूल नांवारूपाला आणलें. त्यांचा धडा गिरवून व अण्णांची आज्ञा घेऊन अशीं हायस्कूलें सातारा जिल्ह्यामध्यें पुढें अनेक निघूं लागलीं.

कुसूरला गाडगे महाराजांनीं कीर्तनांत सांगितलें कीं, "जगांत ईश्वर एक आहे. पण जेथें विद्या नाहीं तेथें देव नसतो. कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षणाचें कार्य करताहेत; तेच खरें ईश्वराचें मंदिर बांधीत आहेत. आतां पाषाणाच्या मूर्तीसाठीं मंदिरें बांधण्यापेक्षां जिवंत देवासाठीं—म्हणजे मुलांसाठीं—ज्ञानमंदिरें बांधलीं पाहिजेत." ह्या बोलण्याचा परिणाम होऊन तेथील मुकादम यांनीं मोठी

देणगी देऊन गाडगे महाराजांच्या नांवानें कुसूरला हायस्कूल काढण्यास अण्णांना विनंती केली. हायस्कूल निघालें. तें चार वर्षें मोफत चाललें.

हायस्कूलसची संख्या भराभर वाढण्याचें दुसरें एक कारण म्हणजे प्रथम कांहीं प्रतिष्ठित मंडळी पैसा गोळा करून हायस्कूल स्थापन करीत, नंतर तें चांगल्या तऱ्हेनें चालावें म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या ताब्यांत देत. अशा प्रकारें हायस्कूलसची संख्या आज सव्वाशेंचा आंकडा गांठीत आली आहे. कर्मवीर अण्णांचीं १०१ हायस्कुलें काढण्याची मनीषा अशा रीतीनें पूर्ण झाली.

**वसतिगृहयुक्त मोफत शिक्षण**

१९४५ च्या सुमारास संस्थेचीं आठ हायस्कुलें झालीं होतीं. त्यांतून उत्तीर्ण होणाऱ्या मुलांना कॉलेजची उणीव भासूं लागली. शहरांत जाऊन कॉलेजचें महागडें शिक्षण घेणें गरिबांच्या मुलांना शक्यच नव्हतें. ही अडचण लक्षांत घेऊन अण्णांनीं कॉलेज काढण्याचा ध्यासच घेतला.

सायन्स व आर्टस् असे एकदम दोन्ही वर्ग काढण्याची त्यांची इच्छा होती. पण प्रथम त्यांना आर्टस् विभाग सुरू करावा लागला. आणि नंतर त्याला सायन्स विभाग जोडला गेला. सातारा येथें मालोजीराजे यांनीं देणगी म्हणून दिलेल्या जमिनींत इमारत बांधून तेथें 'छत्रपति शिवाजी कॉलेज' जून १९४७ मध्यें सुरूं झालें. अण्णांच्या इच्छेनुसार तें कॉलेज 'मोफत आणि वसतिगृहयुक्त' होतें. जो विद्यार्थी वसतिगृहांत राहील आणि

कष्टाचें काम करील त्यास कॉलेजमध्यें व वसतिगृहांत मोफत प्रवेश दिला जाई. या सोईमुळें गरिबांचीं मुलें या कॉलेजमध्यें येऊन शिक्षणाचा फायदा घेऊं लागलीं. पण कॉलेज मोफत चालविलें जातें म्हणून विद्यापीठ कांहीं जास्त ग्रँट देत नव्हतें. त्यामुळें कॉलेज तोटयांत चालत असे. ही परिस्थिति पाहून कॉलेज बंद पडतें कीं काय असें कित्येकांना वाटूं लागलें. पण तसें झालें नाहीं. कांहीं वर्षांनीं कांहीं सद्गृहस्थांनीं अण्णांना विनंती केल्यानें शहरांतील विद्यार्थ्यांनाहि फी घेऊन कॉलेजमध्यें प्रवेश देण्यांत येऊं लागला. पण गरीब विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठीं कॉलेजमध्यें 'स्वावलंबी शिक्षण योजना' मात्र चालू ठेवली. या योजनेद्वारें श्रम करून विद्यार्थी वडिलांचा एकहि पैसा न घेतां शिक्षण घेऊं लागला.

अण्णांनीं दुसरें कॉलेज सन १९५४ मध्यें सातारा जिल्ह्यांतील कराड या शहरीं काढलें. हें शहर कृष्णा-कोयनेच्या संगमावर वसलेलें आहे. व्यापारानें गजबजलेलें आहे. गांवाबाहेर हवेशीर जागा कॉलेजला आहे आणि जवळपासच्या पंचक्रोशींतील मुलांची कमी खर्चांत शिक्षणाची सोय होत आहे. यावरून अण्णांनीं कॉलेजसाठीं निवडलेलें ठिकाण किती योग्य आहे याची कल्पना येते. या कॉलेजचें नांव 'सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज' असें ठेवण्यांत आलें; हें कॉलेजहि साताराच्या कॉलेजच्या तत्त्वानुसार चालत आहे.

याव्यतिरिक्त अण्णांनीं सातारला 'कॉलेज ऑफ एज्युकेशन' हें बी. टी. कॉलेज १९४५ मध्यें सुरू केलें.

त्यास हल्लीं 'आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन' असें नांव दिलें आहे.

### संस्थेच्या व्यापाचा वटवृक्ष

रयत शिक्षण संस्थेचें आतापर्यंतचें कार्य पाहिल्यावर एखाद्या महान् वटवृक्षाची आठवण होते. आणि विशेष म्हणजे वटवृक्ष हेंच ह्या संस्थेचें बोधचिन्ह आहे. माध्यमिक शाळा, ट्रेनिंग कॉलेजें, आर्टस्–सायन्स कॉलेजें आणि इतरहि शाखांमुळें रयत शिक्षण संस्थेचा पसारा खूपच वाढला आहे. आज रयत शिक्षण संस्थेच्या वटवृक्षाच्या फांद्या महाराष्ट्रांतील नऊ जिल्ह्यांत विस्तारल्या आहेत. वटवृक्षाचें एक वैशिष्टय आहे तें म्हणजे वटवृक्षाच्या पारंब्या जमिनींत रुजून त्याचा पुन्हा नवीन वृक्ष बनतो. त्याचप्रमाणें रयत शिक्षण संस्थेच्या निरनिराळ्या शाखा मूळ बुंध्याशीं तर संलग्न आहेतच पण आपापल्या परीनें स्वतंत्रहि आहेत. या महान् वटवृक्षाच्या गर्द नि गार सावलींत आज सारा महाराष्ट्र ज्ञानाचे धडे गिरवीत आहे. हें सर्व कार्य पाहिल्यावर कळून चुकतें कीं, कर्मवीर अण्णांचा काम करण्याचा उरकच दांडगा होता. पांचशें वर्षांत जें काम इतरांना कदाचित् करतां आलें नसतें तें काम त्यांनीं आपल्या एकटयाच्या हयातींत करून दाखविलें. म्हणूनच महात्मा गांधींनीं पाठविलेल्या संदेशांत म्हटलें आहे.

"भाऊरावांचें कार्य हाच त्यांचा कीर्तिस्तंभ आहे"

### कर्मवीर अण्णा अमर झाले

कर्मवीर अण्णांचें शिक्षणकाय

BVBK-0401242

महात्मा ज्योतीराव फुले होत. शिक्षणाचें कार्य करतांना महात्मा फुल्यांचा किती छळ झाला हें सर्वश्रुतच आहे. इतकेंच काय पण मृत्युनंतरहि त्यांचा पुतळा उभारण्यास जोराचा विरोध झाला. त्या महात्मा फुल्यांच्या तैलचित्राचें अनावरण पुणें विद्यापीठांत विद्येच्या मंदिरांत अलीकडेच मोठ्या उत्साहानें झालें. हा प्रसंग नवा मनु सुरू झाल्याची ग्वाहीच देत नाहीं काय ? आणि ह्याचें श्रेय कोणास जात असेल तर शिक्षणकार्यांत म. फुल्यांचे खरे वारसदार असलेले कर्मवीर भाऊराव पाटील यांनाच आहे.

कर्मवीर अण्णा प्रसिद्धीच्या मागें कधींच लागले नाहींत. तथापि महाराष्ट्रीय जनतेनें त्यांना प्रेमानें 'कर्मवीर' ही पदवी बहल करून त्यांच्या सेवेचें चीज केलें. त्याचप्रमाणें भारतसरकारनें त्यांना पद्मभूषण ही पदवी देऊन गौरविलें.

कर्मवीर अण्णा या शिक्षण-भगीरथानें आपल्या कार्यानें सबंध भारताला पद्धतशीर अशी ग्रामीण शिक्षणाची दिशा दाखवून दिली. म्हणूनच कर्मवीर डॉ. पद्मभूषण भाऊराव पाटील हे केवळ महाराष्ट्राच्याच ग्रामीण विभागांतील शिक्षणाचे शिल्पकार नव्हेत तर ते एका अर्थानें नव्या भारताचे शिल्पकार होत. त्यांची प्राणज्योत नियतीच्या निर्दय फटकाऱ्यानें विझली तरी त्यांनीं पेटविलेले असंख्य ज्ञानदीप आज ज्ञानाचा प्रकाश देत आहेत, अन् भविष्यकाळांतहि ते ज्ञानाचा अखंड प्रकाश देत राहतील, अशी ग्वाही द्यावयास हरकत वाटत नाहीं.

* * *

# काहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'काहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्धयर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारी पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठी योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॅरिन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहाद्दर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई बी बीज उठाव : बुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : डॉ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : आवजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : अंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कसबहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्‌गुणी बनण्याची कला : फ्रँकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमाँ
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटु : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

व्होरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.